## विशेष दिवाणी दावा क्र.८/२०१६ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश :-

१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रमिका ३९, नियम १, २ अन्वये दाखल केलेला असून त्याद्वारे प्रतिवादीने दावा मिळकती संदर्भात अन्य कोणा बरोबर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये तसेच, दावा मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी मागणी केलेली आहे.

२. प्रतिवादीने नि.क्र.१४ ला कैफीयत आणि प्रस्तुत अर्जावर म्हणणे देऊन प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतलेला आहे.

३. मी वादीच्या वतीने ॲड. श्री. पी. बी. क्षीरसागर आणि प्रतिवादीच्या वतीने ॲड. श्री. वाय. एम. नहार यांचा युक्तीवाद ऐकला. वर नमद सर्व वस्तुस्थिती विचारात घेता पुढीलप्रमाणे वादप्रश्न निश्चितीकरणासाठी उपस्थित होतात. ते वादप्रश्न, त्यावरील माझे निष्कर्षांसह आणि त्या खालील नमूद कारणांसह मी पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी सकृतदर्शनी केस सिध्द करते काय ? | ... नकारार्थी. |
| २) | सोयीचा समतोल कोणाच्या बाजूने आहे ? | ... अस्तित्वात रहात नाही. |
| ३) | मागणीप्रमाणे मनाई आदेश न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... अस्तित्वात रहात नाही. |
| ४) | कोणता आदेश ? | ... अर्ज रद्द करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ बाबत :-**

४. वादीच्या अभिकथनांचा सारांश असा की, वादी वयोवृध्द, अशिक्षित, विधवा महिला आहे. मुलांच्या आणि मजुरांच्या मदतीने ती दावा मिळकतीमध्ये उत्पन्न घेते. येणा-या उत्पन्नातून वादीचा चरितार्थ चांगल्या प्रकारे चालत होता. तिच्या गरजा मर्यादित स्वरुपात होत्या. तिच्यावर कोणतेही कर्ज नव्हते. त्यामुळे, दावा मिळकत कधीही विक्री करण्याचा तिचा मनोदय नव्हता.

५. वादी, प्रतिवादी आणि प्रतिवादीचे पती यांचे वादीची सून लिलाबाई हिच्याबरोबर किरकोळ स्वरुपाचे मतभेद झाले होते. त्यातून लिलाबाई हिने त्यांच्याविरुध्द खोटी फौजदारी तक्रार न्यायालयात दाखल केली. त्याकामी, वादी प्रतिवादी आणि प्रतिवादीचे पती न्यायालयात एकत्र जात येत होते.

६. दिनांक १२/०६/२०१४ रोजी प्रतिवादी आणि तिच्या पतीने न्यायालयात दाखल असलेल्या तक्रारीला विरोध करण्यासाठी तक्रार दयायची आहे तसेच विधवा महिलांना मिळणा-या अनुदाना संदर्भात कारवाई करण्याची आहे असे सांगून वादीला तहसील कार्यालयात आणून तिचे कागदपत्रांवर अंगठे घेतलेले आहेत. कारवाई पूर्ण होऊ शकत नाही असे सांगितल्यामुळे वादी परत दुस-या दिवशी दिनांक १३/०६/२०१४ रोजी प्रतिवादी आणि तिच्या पतीसोबत श्रीगोंदा येथे आली होती. त्यावेळी, प्रतिवादी आणि तिच्या पतीच्या सांगण्यानुसार वादीने स्वत:चे अंगठे आणि छायाचित्र दिलेले आहेत.

७. दिनांक २४/०२/२०१६ रोजी वादी दावा मिळकतीमध्ये झालेल्या पिकाची काढणी घेत असतांना प्रतिवादी दावा मिळकतीत आली आणि तिने दावा मिळकत तिच्या मालकीची असल्याचे सांगितले. त्यामुळे, वादीने दावा मिळकतीचे उतारे काढले असता दिनांक १२ आणि १३/०६/२०१४ रोजी प्रतिवादीने दावा मिळकत खरेदीपत्राने स्वत:च्या नांवावर

करुन घेतले असल्याचे वादीस समजले. प्रतिवादी आणि तिच्या पतीकडे या संदर्भात चौकशी केली असता त्यांनी वादीला वेगवेगळया धमक्या दिल्या. तेंव्हा प्रतिवादी आणि तिच्या पतीने वादीची फसवणूक आणि विश्वासघात केलेला आहे हे वादीच्या लक्षात आले.

८. खरेदीपत्राचा दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात दिनांक १३/०६/२०१४ रोजी नोंदविण्यात आलेला आहे. त्यामध्ये मोबदला रक्कम रु.६ लाख वादीला दिल्याचा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात वादीने दावा मिळकत विक्रीसाठी काढलेली नाही. उभय पक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची देवाणघेवाण झालेली नाही. तेंव्हा, झालेले खरेदीपत्र हे मूलतः बेकायदेशीर, पोकळीस्त आणि रद्दबातल आहे, वगैरे.

९. प्रतिवादीच्या अभिकथनांचा सारांश असा की, दावा मिळकत वादीच्या वैयक्तिक मालकी वहिवाटीची होती. प्रतिवादी वादीची मुलगी आहे. तिला आणखी दोन सख्खे भाऊ आणि तीन सख्ख्या बहिणी आहेत.

१०. प्रतिवादीचा भाऊ रामदास सन् २००२ मध्ये मयत झालेला आहे आणि वडील २००७ मध्ये मयत झालेले आहेत. वादीचा एक भाऊ लक्ष्मण देवदैठण, श्रीगोंदा येथे राहतो तर दुसरा भाऊ मारुती हा सावंतवाडी हिंगणी, ता. श्रीगोंदा येथे राहून शेती व्यवसाय करीत आहे. वादीची मुले आणि त्यांच्या पत्नी वादीचा व्यवस्थित सांभाळ करण्या ऐवजी तिला विनाकारण त्रास देत होते. २०१२ मध्ये वादी हृदय विकाराने आजारी असतांना प्रतिवादीचे भाऊ आणि बहिणींनी तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आणि प्रतिवादीनेच वादीच्या औषधोपचारांचा खर्च केला आहे.

११. वादीची मुले म्हणजे प्रतिवादीचे भाऊ दावा मिळकतीच्या वहिवाटीस मदत करण्या ऐवजी दावा मिळकत बळकाविण्याच्या दृष्टीने वादीला धमकावत असत. वादीला दैनंदिन खर्चासाठी तसेच औषधोपचारांच्या खर्चासाठी दारोदार भटकावे लागत होते. त्यामुळे, तिने दावा मिळकत विक्री करण्याचे ठरवून प्रतिवादीकडे तशी विचारणा केली. प्रतिवादीने ते

मान्य केल्यानंतर दावा मिळकतीची विक्री किंमत सव्वा लाख रुपये ठरली. वादीने या मिळकतीवर पूर्वीच राजापूर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे कर्ज घेतलेले असल्यामुळे त्या रकमेची परतफेड केल्याशिवाय दावा मिळकतीचे खरेदीपत्र नोंदविणे शक्य नव्हते. त्यामुळे, प्रतिवादीने त्या कर्जाची परतफेड केलेली आहे.

१२. खरेदीपत्राची उर्वरीत रक्कम देण्यासाठी प्रतिवादीने वेळोवेळी जमा केलेली रक्कम तसेच प्रतिवादीचा मुलगा प्रवीण याच्या नांवे खरेदी केलेल्या गट क्र.३० पैकी ४० आर क्षेत्राची विक्री करुन आलेली रक्कम तसेच नातेवाईक व परिचितांकडून उसनी रक्कम घेऊन प्रतिवादीने खरेदीपत्राची विक्री रक्कम वादीला दिलेली आहे.

१३. ती रक्कम मिळाल्यानंतर प्रतिवादीने दिनांक १२/०६/२०१४ रोजी दु.निबंधक कार्यालयात उपस्थित राहून दस्त तयार करण्यासाठी माहिती दिली आणि दिनांक १३/०६/२०१४ रोजी स्वत:हून श्रीगोंदा येथे उपस्थित राहून खरेदीपत्र प्रतिवादीच्या लाभात नोंदूवन दिले. त्याचदिवशी वादीने प्रतिवादीला दावा मिळकतीचा ताबा दिला. तेंव्हापासून वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादीची प्रगती सहन न झाल्याने काही विघ्नसंतोषी लोकांनी वादी मार्फत खोटा दावा आणि खोटा अर्ज केलेला आहे.

१४. उभय पक्षांच्या वतीने केले गेलेले युक्तीवाद त्यांच्या अभिकथनांनुरुप आहेत. उभय पक्षांची अभिकथने विचारात घेता वादीच्या अभिकथनांप्रमाणे खरेदीपत्र करण्यात आलेले आहे. वादीचे मुख्य कथन एवढेच की, सदर वादग्रस्त दस्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे विक्री रक्कम वादीला मिळालेली नाही, वाद मिळकतीचा कब्जा प्रतिवादीला देण्यात आलेला नाही आणि वाद मिळकत विक्री करण्याचा वादीचा कधीही मानस नव्हता तेंव्हा वादीची फसवणूक झालेली आहे.

१५. वादीने नि.क्र.३ सोबत सदर वादग्रस्त खरेदीपत्राची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूरावरुन सकृतदर्शनी सदरील खरेदीपत्र वादीने प्रतिवादीला नोंदवून दिले

आणि खरेदीपत्राच्या दिवशी दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादीला दिला असे दिसून येते. वादीच्या फसवणुकीच्या अभिकथनांच्या संदर्भात सद्यस्थितीत कोणताही पुरावा दाखल नाही. तेंव्हा अशा प्रकारची वादीची अभिकथने पुराव्याअंतीच सिध्द होऊ शकतात. वादीने तिच्या कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.२६ ला अनुक्रमे श्री. किसन हरिभाऊ पठारे या वादीच्या भावाचे, सहहिस्सेदाराचे प्रतिज्ञापत्र आणि नि.क्र.२७ ला श्री. राजाराम शहाजी वीर या लगतच्या गटातील सहहिस्सेदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्याचा आशय असा की, दावा मिळकत अद्यापपावेतो वादीच्याच ताब्यात आहे आणि प्रतिवादीने त्यात वहिवाट केल्याचे सदर साक्षीदाराने कधीही पाहिलेले नाही.

१६. या उलट, प्रतिवादीच्या वतीने दोन साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे नि.क्र.२८ व १८ ला देण्यात आली आहेत. पैकी नि.क्र.२८ ला असलेल्या श्री. रविंद्र नानाभाऊ मांडगे या वादीच्या भाच्याचा (सख्ख्या बहिणीचा मुलगा) पुरावा प्रतिवादीच्या सर्व अभिकथनांना दुजोरा देतो तर नि.क्र.१८ चा श्री. बाळासाहेब बापू धाडगे या वादीच्या चुलत भावाचा पुरावा देखील प्रतिवादीच्याच अभिकथनांना दुजोरा देतो. थोडक्यात, वादी आणि प्रतिवादीचे दोन्ही साक्षीदार दावा मिळकतीच्या कब्जा बाबत उभय पक्षांच्या अभिकथनांना दुजोरा देतात. त्यामुळे, त्यांचा पुरावा सद्यस्थितीत कोणत्याही उपयोगाचा नाही.

१७. या शिवाय, प्रतिवादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादीच्या नांवे कोणतेही क्षेत्र शिल्लक नसून प्रतिवादीच्या नांवे दावा गटातील १ हे ४८ आर क्षेत्र मालकी हक्क आणि कब्जेदार सदरी नोंदविले असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर प्रतिवादीने कामगार तलाठयांचा दाखला दिनांक २५/०८/२०१६ चा दाखल केलेला असून त्याचा आशय असा की, प्रतिवादीने १ हे ४८ आर जमिनीमध्ये वेगवेगळी पिके २०१६-२०१७ या सालात घेतलेली आहेत.

१८. अशा परिस्थितीत, सकृतदर्शनी दावा मिळकत वादीने प्रतिवादीला खरेदीपत्राद्वारे विक्री केली आणि त्याचा कब्जाही दिला हे स्पष्ट आहे. त्यामुळे, सकृतदर्शनी

प्रतिवादी दावा मिळकतीची मालक असल्याने तिने कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीचे हस्तांतरण करु नये म्हणजे पर्यायाने तिच्या कायदेशीर हक्कांची अंमलबजावणी करु नये असा कोणताही मनाई आदेश प्रतिवादीविरुध्द देता येणार नाही. त्याचप्रमाणे, वादी सकृतदर्शनी दावा मिळकतीच्या कब्जात नसल्याने तिच्या कब्जे वहीवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये असाही मनाई आदेश प्रतिवादीविरुध्द देण्याचे कोणतेही कायदेशीर प्रयोजन नाही. म्हणून, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ व ३ बाबत</u> :-**

१९. वर नमूद वादप्रश्न क्र.१ च्या निष्कर्षाच्या पार्श्वभूमीवर हे वादप्रश्न अस्तित्वात रहात नाहीत. म्हणून, मी त्यांचे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदविले आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.४ बाबत</u> :-**

२०. वर नमूद निरीक्षणे व कारणांच्या पार्श्वभूमीवर मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करते :

**-: <u>आदेश</u> :-**

१. अर्ज रद्द करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर).

(वर्षा बा. पारगांवकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
**श्रीगोंदा**

दिनांक : २५/०१/२०१७.